करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१३ | पाने-१२ | दि.२४/०१/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रु.


Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप)
4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
व्हेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज

लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)

# बंद आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीचा बार उडणार

## प्रशासनाची धावपळ सुरू

करमाळा : बंद असलेल्या आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचा बार २०२५ मध्ये उडणार; असे चित्र दिसू लागले आहे. त्यानुसार प्रशासनाची धावपळ सुरू झाली आहे. त्यानुसार प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यासाठी कारखान्याकडून प्रादेशिक सह संचालक यांचेकडे सभासदांची आकडेवारी सादर करण्यात आली आहे.

जून २०२२ मध्ये आदिनाथ कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत संपलेली होती. कोरोनामुळे ही निवडणूक वेळेत झाली नाही. दरम्यान ३० जून २०२३ पर्यंत पात्र सहकारी संस्थांची निवडणूक घेण्याचा आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिले होते. निवडणुकीसाठी खर्च भरण्याबाबत कारखाना प्रशासनाला सूचित केल्यानंतर तत्कालीन अध्यक्ष धनंजय डोंगरे यांनी १० लाख रूपये भरले होते. तेव्हा कारखान्याकडे २९ हजार १६८ मतदार होते. या निवडणुकीस ३५ लाख २९ हजार ३२८ रूपये आवश्यक होते. मात्र कारखाना राहिलेले साधारणत: २५ लाख रूपये भरले नाही. त्यामुळे कारखान्यावर प्रशासक नेमण्यात आले होते. त्यानंतर कारखान्यावर प्रशासकीय संचालक मंडळात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे व संजय गुटाळ यांना संधी मिळाली होती. दरम्यान त्यांनी निवडणुकीस मार्च २०२४ मध्ये राहिलेले पैसे भरण्याबाबत पत्र दिले होते. दरम्यान कारखान्यावर पुन्हा विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, डॉ.वसंतराव पुंडे व दिपक देशमुख यांची प्रशासकीय संचालक म्हणून वर्णी लागली होती. ही निवडणूक कोण कोणाच्या विरूध्द लढणार याची तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. माजी आमदार जयवंतराव जगताप व विद्यमान आमदार नारायण आबा पाटील हे एकत्र पॅनल करून निवडणूक लढविणार असल्याचे समजते. दरम्यान माजी आमदार संजयमामा शिंदे व बागल गट हे ही निवडणूक स्वतंत्र लढणार की एकत्र येऊन लढणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

> कारखान्याचे कार्यकारी संचालक अरूण बागनवर यांचेकडून मिळालेल्या माहितीनूसार कारखान्याने प्रादेशिक सह. संचालक यांच्या आदेशानूसार कारखान्याने मतदार यादी पाठवली आहे. कारखान्याकडे सध्या ४०५ सहकारी संस्था व २८ हजार ६८७ सभासद आहेत. वरीष्ठांच्या आदेशाने पुढील कार्यवाही होणार आहे. निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द होणे, त्यावर आक्षेप व अंतिम मतदार यादी अशी प्रक्रिया सुरू झाली असल्याचे सांगितले.



दुसऱ्याची कर्तबगारी अन् भूषण तिसऱ्याला असे कधीच होत नाही....!

संपादकीय..........................................!

# स्वालंबन !

काही वर्षापुर्वी टि.व्ही. वरील एका चॅनलवर तांदळाच्या कंपनीची जाहिरात पाहिली. त्या जाहिरातीने काही वेळ लक्ष वेधून घेतले. ती जाहिरात अशी होती... एक जाडाजुडा माणूस नेहमीच खात असतो. खाता खाताच तो तोंडाने ब्रु.. असा आवाज करतो. त्यांने आवाज केला की, पाईपाने झाडाला पाणी घालणारा त्याचा नोकर तोच पाईप डोक्यावरून,पायाखालून फिरवतो आणि दोरीच्या उड्या माराव्या तशा उड्या मारत व्यायाम करतो. नंतर तो डायनींग टेबलवर बसून खातो. त्यावेळी त्याचा नोकर काही सामान घेऊन येतो , खादाड मालक पुन्हा तोंडाने ब्रु...असा आवाज करतो. त्यानंतर तो नोकर तेच सामान हातात घेऊन व्यायाम सुरू करतो.पुन्हा हा खादाड भात खातच असतो ,नंतर तो पुन्हा तोंडाने तो ब्रु... असा आवाज करतो तेंव्हा त्याची मोलकरीन त्याच्यासाठी व्यायामाच्या सायकलला पायंडल मारते. शेवटी त्याची पत्नी जाहीरात असलेल्या कंपनीचा तांदूळ घेऊन येते, त्यावेळी तो तीलाही व्यायामाची खूण करतो. पण ती त्याला आता व्यायामाची गरज नाही हे सांगते. या कंपनीच्या तांदळाचा भात खाल्यानंतर त्याला पचवण्यासाठी व्यायामाची गरज नाही.व्यायाम न करताही त्याचे चरबीत रूपांतर होत नाही असे सुचवते. याचवेळी पाठीमागे एक वाक्य सांगितले जाते. कोणासाठी कोणी व्यायाम केलातर कसे चालेल भाऊ..?

ही जाहीरात एका तांदळाच्या कंपनीची असलीतरी त्यामधील अर्थ प्रत्येक व्यक्तीला उपयुक्त असा आहे. त्यामुळे त्याकडे लक्ष वेधले. आपण आपल्या जीवनात व्यायाम दुसऱ्याकडून करून घेत नसलो तरी बऱ्याच गोष्टी दुसऱ्याकडून करून घेतो व त्याचे श्रेय कारण नसताना स्वत:कडे घेतो आणि उगाचच समाधानी होतो. वर्षानुवर्षेही परंपरा आपल्याकडे चालत आली आहे. त्यात आपण बरबाद झालोतरी ते आम्हाला समजत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. याबाबत एक दृष्टांत वाचला. एक गुरू भ्रमंती करत निघाले होते. रस्त्यात ते त्यांच्या शिष्याकडे मुक्काम करत ,चांगले चुंगले खात असे आणि जाताना दक्षिणा घेऊन पुढे जात असे. असा त्यांचा दिनक्रम ठरला होता. दररोज नव्या शिष्याकडे त्यांचा चांगला बेत होत असे व दररोज दक्षणाही खूप मिळत असे. पण एका गावात एक शिष्य शेराला सव्वा शेर भेटला. त्यांनी गुरूचे स्वागत केले. जेवण केले. जाताना गुरूचे दर्शन घेतले. गुरूजीने त्याला अशिर्वाद दिला. बेटा तुझे भले होवो, तुला शंभर एकर जमीन मिळो व गावावर तुझे राज्य येवो. त्यानंतर शिष्य गुरूला म्हणाला. गुरूजी तुम्हालासुध्दा मुंबई शहर मिळो, त्यावर तुमचे राज्य येवो. गुरूजी म्हणाले. दक्षिणा ...? शिष्य म्हणाला. महाराज तुम्हाला मुंबई शहर अर्पण केले. यापेक्षा दुसरी काय दक्षिणा..? यावर गुरूजी म्हणाले अरे असे नुसते बोलून काय घडते का..? त्यावर शिष्य म्हणाला तुम्ही नुसता आशिर्वाद देता मग त्यातून खरेच मिळते की काय..? गुरू गप्प बसले व पुढे निघाले. थोडक्यात काय तर काही दिल्याशिवाय दुसऱ्याला मिळत नाही. स्वत: खाल्ल्याशिवाय स्वत:चे पोट भरत नाही, स्वत: पाहिल्याशिवाय वस्तुचे आकलन होत नाही. तरीही आपण दुसऱ्यांनी केलेल्या गोष्टी आमच्याच व आमच्याचसाठी असे कसे म्हणतो.

आपण धर्माच्या नावावर स्वत:ची किती फसवणूक करून घेतो पहा. सत्यनारायणाची पुजा दुसरा करतो, पोथी तोच वाचतो, प्रसाद तोच करतो आपण फक्त काही तरी मागे म्हणतो, देवाच्या पाया पडतो आणि देवाकडून पुण्य मिळते असे म्हणून हजारो रूपयाला डुबतो. जागरण -गोंधळ करणारे वेगळेच असतात. रात्र रात्र गोंधळ करतात, देवाची पूजा करण्यापासून लंगर तोडण्यापर्यंत सर्व कामे तेच करतात. आपण नैवेद्य ठेवायचा, लोकांना जेवू घालायचे, दर्शन घ्यायचे, हजारो रूपये खर्च करायचे . बस्स... देव कसा मिळेल ? कंदुरी करणारे लोक, मरीआईची जत्रा करणारे लोक, जीव बोकडाचा जातो आणि पुण्य आम्हाला मिळवायचा प्रयत्न करतो. ते कसे मिळेल..?, अनेक मंदिरात अभिषेक करणारे वेगळेच असतात पण आपण म्हणतो आजचा अभिषेक आमचा आहे. अभिषेक करणारा सर्व विधी करतो आणि मालकाला पैसे मागतो. प्रत्येक मंदिरात अशीच प्रथा आहे.देव असा भेटत नाही.

संत तुकाराम महाराज म्हणतात.., "न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण।। ठायीची बैसोनी करा एकचित्त । आवडी आनंत आळवावा ।।" देवासाठी काही करावे लागत नाही पण आपण नको ते उपचार करून मातीत जातो ,प्रगती ऐवजी अधोगती करतो.

कुटूंबामध्ये सुध्दा बऱ्याच गोष्टी अशा आहेत. मुलगा कष्टाने मोठा अधिकारी होतो व वडील त्याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करतो. मुलगा बिघडलातर मात्र मुलाला दोष देतो. तर कधी कधी वडीलाचे श्रेय मुलगा लाटतो. इतरांचे श्रेय लाटून स्वत्व जपले जात नाही. स्वत्व जपण्यासाठी स्वत:च केले पाहिजे. राजकीय घराण्यात पत्नी नगरसेविका, नगराध्यक्ष, सरपंच, सभापती असते. पण पुरूष मंडळी आपणच पदावर असल्यासारखे अविर्भाव आणतात. असा अविर्भाव का आणावा..? किती आणावा हा महत्वाचा प्रश्न आहे. हाच प्रकार कार्यकर्त्यांच्या कामाबाबत अथवा नेत्याच्या कामाबाबत नेहमीच घडतो. बरीच कामे नियमानुसार होत असतातच पण त्याचे श्रेय लाटण्यासाठी झुंबड उडते. एखादे काम तिसरीच व्यक्ती करते पण त्याचे श्रेय स्वत:च्या नावावर घेण्यासाठी नेते धडपड करत असतात. ती धडपड खरंच केविलवाणी असते. जे काम आपण केले नाही ते मी केले हे मोठाडपणे व खोटारडेपणाने कसे सांगावे; हे या मंडळीकडून शिकावे. खरंच जनतेला ते कळत नाही का..? मतदार एवढे भोळे आहेत का..? किती दिवस मतदारांना बनवायचे याचा विचार नेते मंडळीनी करण्याची वेळ आली आहे. आपल्या पूर्वजांनी केलेल्या कर्तबगारीची पुन्हा पुन्हा उजळणी करून किती दिवस राजकारण करता येईल ? याचाही आता विचार केला पाहिजे. स्वत: जे केले तेच मांडावे व सतत काहीतरी करावे हा राजकारणाचा मूळ गाभा आहे; पण त्याचा आम्हाला विसर पडला आहे.

जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला अशी म्हण आहे.याबाबत साळुंकीची कथा फार काही सांगून जाते. साळुंकीचे घरटे साळीच्या शेतात असते. साळी कापायला आल्यानंतर मालक मुलांना म्हणतो.., सोयऱ्याला उद्या बोलवा शेत कापू. साळुंकीची पिल्ले आपल्या आईला सांगतात.., उद्या मालकाचे सोयरे येणार आपलं घर काढावं लागेल. साळुंकी म्हणते.., काळजी करू नका, नंतर मालक भावकीला निरोप देतो पण साळुंकी चिंता करत नाही. पुन्हा मालक मित्रपरिवाराला निरोप देतो, साळुंकी चिंता करत नाही. कोणीच येत नाही म्हटल्यावर मालक म्हणतो.., उद्या आपणच येवू कोयते शेवटून घ्या. हा निरोप पिल्ले आईला सांगतात तेंव्हा आई म्हणते.., बाळानो चला घर बदलू तुमचे सामान आवरा. थोडक्यात कोणावर कोणी अवलंबून काही होत नसते, स्वत:च सर्व काही करावे लागते तरच खरा निभाव लागणार आहे. मग शेती असो, कारखानदारी असो, राजकारण असो नाहीतर परमार्थ असो. त्यामुळे इतराकडून काही करून घेण्याची गरज काय..? याचा विचार झाला पाहिजे स्वावलंबी व सत्यवादी बनले पाहिजे. तरच खरी प्रगती आणि मानसिक समाधान मिळणार आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# २ फेब्रुवारीला माघवारी पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान

करमाळा(सं.प्र.): किन्नावेस येथील श्री विष्णू मंदिर ते श्री क्षेत्र पंढरपूर या माघवारी पायी दिंडी सोहळ्याचे २ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता प्रस्थान होणार आहे. ह.भ.प.मंदाताई डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २४ वर्षापासून माघवारी पायी दिंडी काढण्यात येते. यावर्षी दिंडीचे २५ वे वर्षे आहे. ही दिंडी देवळाली, जेऊर, आदिनाथ कारखाना, पांगरे, कंदर, वेणेगाव, परिते, करकंब, भोसे (सुतारवस्ती), विठ्ठल कारखाना मार्गे पंढरपूरला जाते. या दिंडीत काकडा, भजन, प्रवचन, हरिपाठ, बारा अभंग, किर्तन आदी विविध दैनंदिन धार्मिक कार्यक्रम होतात. दिंडीमध्ये मृदुंगाचार्य म्हणून घनशाम सुतार (कोंढेज), किसन खरात (सरपडोह), चैतन्य डोळस., पेटीवादक म्हणून बाळासाहेब डोळस, चौपदार म्हणून मधुकर खंडागळे (गुळसडी), विणेकारी अनिल शिंदे (जातेगाव), गायक म्हणून गोरख क्षीरसागर (सरपडोह) हे भुमिका पार पाडतात. ९ फेब्रुवारीला सकाळी १० ते १२ पंढरपूर येथे मंदाताई डोळस यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वाटप केला जाणार आहे.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



जय बजरंगबली
टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

● वैष्णोदेवी, कास्मिर, अमृतसर दर्शन
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
सहल खर्च रू.२६,०००
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५

● नेपाळ दर्शन (रेल्वे प्रवास ३ एसी)
काशी, आयोध्या, प्रयागसह..
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते ४/४/२०२५
सहल खर्च रू.२७,५००

● गंगासागर दर्शन
गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.१७/४/२०२५ ते २५/४/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

● गुजरात दर्शन
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
कालावधी : दि.२९/४/२०२५ ते ६/५/२०२५
सहल खर्च : रू.११,०००

● कन्याकुमारी दर्शन
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.२६/५/२०२५ ते ४/६/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

● चारधाम दर्शन
कालावधी : दि.१०/६/२०२५ ते २५/६/२०२५
सहल खर्च : रू.३५,०००

● रेल्वे प्रवास ● बस प्रवास
● भोजन व्यवस्था ● राहण्याची उत्तम सोय





बुकींग सुरू
संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

आंतरराष्ट्रीय अबॅकस व वैदीक मॅथ्स परीक्षेत

# मुथा अबॅकस अकॅडमीचे घवघवीत यश



करमाळा (सं.प्र.) : पुणे येथे झालेल्या ॲरिस्टो किड्स अंतर्गत घेण्यात आलेल्या ऑफलाइन आंतरराष्ट्रीय अबॅकस व वैदीक मॅथ्स परीक्षेत करमाळा येथील मुथा अबॅकस अकॅडमीने घवघवीत यश संपादन करून गरूड झेप घेतली केले आहे.


या परीक्षेत २३ देशासह एकूण तीन हजार विद्यार्थ्यांनी विविध लेवल मधून सहभाग नोंदवला होता. प्रास्ताविक मॅनेजिंग डायरेक्टर उज्वल पांडा यांनी केले. यावेळी ते म्हणाले, की अबॅकस वैदिक मॅथ्सचा उपयोग आपल्याला उज्वल यश भविष्यामध्ये मिळविण्यासाठी होतो. लहान वयात अबॅकसचे नॉलेज घेतल्यानंतर विद्यार्थ्यांचा मेंदू कॅल्क्युलेटर पेक्षाही गतीने काम करताना दिसून येतो. तसेच शालेय अभ्यासात प्रगती होण्यासाठी व प्रत्येक स्पर्धात्मक परीक्षेसाठी अबॅकसचा कसा उपयोग होतो, त्याचे उदाहरणाद्वारे उपस्थितांना सांगितले.

यावेळी विविध स्तरावरून पालक, विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेचा निकाल त्याच दिवशी सायंकाळी पुणे येथे जाहीर केला. या परीक्षेत विद्यार्थ्यांना दहा मिनीटात अबॅकससाठी ७५ गणिते अचूक सोडविणे अनिवार्य होते. यामध्ये करमाळा येथील सार्थक वनारसे (इंटरनॅशनल रँक तिसरा), सार्थक संजय करंडे (आंतरराष्ट्रीय रँक चौथा), आदित्य अभिजीत दुधे (आंतरराष्ट्रीय रँक प्रथम) तसेच विवान दिनेश मेहेर (आंतरराष्ट्रीय प्रथम रँक), स्वरा प्रितम बलदोटा (आंतरराष्ट्रीय रँक सहावा व आंतरराष्ट्रीय रँक सेंकड) या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त करून मुथा अबॅकस अकॅडमीची यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली. मुथा अकॅडमीचे एकूण ५६ विद्यार्थी परीक्षेसाठी सहभागी झाले होते. अभिनव पब्लीक स्कुल वाशिंबे येथील विद्यार्थीही परीक्षेत सहभागी झाले होते.


**आंतरराष्ट्रीय क्रमांकावर विविध लेवल मधून बक्षीस मिळविलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे..**

शर्वरी रोहित शिंदे (रँक ७ वा), प्रणील अनिल वैद्य (रँक ४९ वा), सुयश दयानंद चौधरी (रँक १९ वा), श्रावणी रामेश्वर खराडे (रँक ७ वा), आर्यन तात्यासाहेब जाधव (रँक १८ वा), अथर्व गहिणीनाथ बनसोडे (रँक ३२ वा), साद बागवान (रँक ५० वा), रिध्दी प्रशांत शिंदे (रँक ५४ वा), प्रतिक जालिंदर सावंत (रँक ५५ वा), राजवी चिन्मय मोरे (रँक ५८ वा), आरूष बलभिम बनसोडे (रँक १८ वा), आदेश आशिष मेहता (रँक १२५ ), शंभुराजे प्रफुल्ल शिंदे (रँक ९३ वा), शिवतेज वर्धमान जाधव (रँक ७७ वा), ऋषिराज वीरेंद्र लष्कर (रँक ५२ वा), रिदम भुपेंद्र बोराडे (रँक ९ वा), शरयू रघुनाथ फरतडे (रँक ११ वा), अन्वी अमोल हिरण (रँक ५० वा), रियांशी प्रणितकुमार जैस्वाल (रँक ४५ वा), ईश्वरी भारत मुकणे (रँक ३० वा), साई सागर काळे (रँक ५९ वा), यश नरेश शहा (रँक २१ वा), स्पंदन बापू घरबुडे (रँक १६ वा), आर्यन शामराज कापसे (रँक १०२ वा).

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुथा अबॅकस अकॅडमीच्या संचालिका ज्योती मुथा तसेच स्मिता वनारसे, पुजा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांनी केले.



प्रियंका आय केअर हॉस्पीटल



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर यांचा किर्तनाचा कार्यक्रम संपन्न

## किर्तन ऐकण्यासाठी भाविकांची मोठी मर्दी



करमाळा(सं.प्र.) : देशभक्त स्व.नामदेवरावजी जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण फाउंडेशन, करमाळा यांचे वतीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, करमाळा नगरपरिषद बांधकाम विभागाचे माजी सभापती राहुल जगताप, करमाळा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रतापराव जगताप यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुप्रसिध्द समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या किर्तनाचा कार्यक्रम १० जानेवारीला दुपारी चार वाजता यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या पाठीमागील मैदानामध्ये संपन्न झाला.

किर्तन आयोजित करण्यासाठी कंदरचे सरपंच भास्करराव भांगे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी करमाळा शहर आणि तालुक्यातील हजारो भाविक भक्तांनी सदर किर्तन श्रवणाचा लाभ घेतला. या कार्यक्रमास माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, शिवसेनेचे करमाळा तालुका नेते दिग्विजय बागल, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, सामाजिक कार्यकर्ते अतुल खुपसे-पाटील, मकाई कारखान्याचे चेअरमन दिनेश भांडवलकर, आदिनाथ कारखान्याचे चेअरमन धनंजय डोंगरे, भारतीय जनता पार्टी सोलापूर जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, संतोषराव फाटके (भाऊजी), पंचायत समितीचे माजी सभापती शेखर गाडे, पंढरपूरचे नेत्ररोग तज्ञ डॉ.मनोज भायगुडे, नामदेवरावजी जगताप अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य मिलींद फंड, पंचायत समितीचे माजी सदस्य ॲड.राहुल सावंत, देवानंद बागल, भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, काँग्रेसचे जिल्हा वरीष्ठ उपाध्यक्ष अशोकराव चोपडे, अमरजित पाटील, अरूणकाका जगताप, निखिल चांदगुडे, भाजपाचे तालुका अध्यक्ष रामभाऊ ढाणे, माजी नगरसेवक बाळासाहेब क्षीरसागर, पै.अफसर जाधव, औदुंबरराजे पाटील, पै.अनिल फाटके, उद्योजक निशांत गव्हाणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सचिन कटारिया, सुजय जगताप, प्रतिक जगताप, गणेश फलफले, योगेश राखुंडे, नितीन चोपडे, निखिल कदम, हनुमंत रजपुत आदींनी परिश्रम घेतले.

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
**डॉ.लोकरे हॉस्पिटल** मध्ये **सोमवार** व **गुरूवारी उपलब्ध**
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे** (एम.एस.मुंबई)
**उपलब्ध सुविधा...**
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
**ओपीडीचे वैशिष्ट्ये...**
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

## विविध क्षेत्रात नावलौकीक मिळवणाऱ्या

# ग्रामपंचायतीच्या वतीने उंदरगाव येथील भुमीपत्रांचा सन्मान



करमाळा(सं.प्र.) : उंदरगाव येथील वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये भरारी घेणाऱ्या व नावलौकीक मिळवणाऱ्या तरूण व नागरीकांचा ग्रामपंचायतीच्या वतीने भुमीपुत्रांचा सन्मान करण्यात आला.

उंदरगाव येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरात भुमीपुत्रांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमात आय.एफ.एस. अधिकारी आप्पासाहेब निकत, सेवानिवृत्त अभियंता चांगदेव पाटील, ग्लोबल सायन्स इन्स्टीट्यूटचे महेश निकत, सोमनाथ पाटील, प्रा.राजेंद्र निकत, सोमनाथ कांबळे, मेजर सिताराम खरात, नारायण कांबळे, श्रीधर कांबळे, ग्रामसेवक संतोष कांबळे, जोतिराम पाटील, नामदेव पाटील, ॲड.सोमनाथ कोकरे, प्रविण गरदडे, लक्ष्मण पाटील, गणेश जावळे, सागर कुंभार, सेविका जयश्री ताकमोगे, स्वाती सरडे, मदतनीस भारती जावळे,कोमल कांबळे, वंदना शिंदे यांच्यासह इतर भुमीपुत्रांचा फेटा फळांचे रोप व सन्मानपत्र देवून सन्मान करण्यात आला.

**मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस**
व
**सर्व सेवा केंद्र**
**मस्कर ट्रेडिंग कंपनी**
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

**विघ्नहर्ता इंटिरीयर**
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
**देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर**
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन प्लोरींग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

**समर्थ** बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

**उपलब्ध सुविधा..** ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक

**महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)**

● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# करमाळा तालुक्याच्या विकासकामांसाठी सदैव पाठीशी खंबीरपणे उभा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दिग्विजय बागल यांना आश्वासन



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्याच्या विकासकामांसाठी व प्रगतीसाठी मी सदैव तुझ्या पाठीशी खंबीरपणे उभा असून, आपल्या वडिलांप्रमाणे म्हणजे माजी मंत्री स्व.दिगंबररावजी बागल मामा यांच्या कार्य पध्दती प्रमाणे सर्वसामान्य जनतेच्या नेहमी संपर्कात राहून कार्यरत रहा. तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत सहकार्य राहील; असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा ग्रामविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मकाई कारखान्याचे माजी चेअरमन व शिवसेना युवा नेते दिग्विजय बागल यांना मुंबईत दिले.

मुंबई मंत्रालय येथे दिग्विजय बागल यांनी करमाळा तालुक्यातील विविध विकासकामांबाबत मंत्र्यांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी ना.शिंदे यांनी वरीलप्रमाणे आश्वासन दिले. या भेटीदरम्यान दोघांमध्ये अनेक महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली. प्रस्तावित रिटेवाडी उपसासिंचन या महत्वाच्या योजनेच्या सर्व्हे कामाला लवकर सुरूवात करून योजना गतीने पूर्ण करण्याची विनंती यावेळी बागल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे केली. त्याला शिंदे यांनी होकारात्मक प्रतिसाद दिला.

तालुक्यातील रस्त्यांची दुरावस्था नजरेला आणून देऊन तालुक्यातील विविध रस्त्यांच्या कामाला निधी मंजूर करण्याची विनंती केली. करमाळा शहरातील विस्कळीत व दुषित पाणीपुरवठा, शहरातील स्वच्छतेबद्दल प्रशासनाची उदासीनता, महावीर उद्यानाची दुरावस्था, करमाळा शहरातील वाहतुकीची कोंडी इ. प्रश्नासोबतच करमाळा एस.टी. आगाराच्या ढिसाळ प्रशासन कालबाह्य व नादुरूस्त झालेल्या बसेस त्यामुळे प्रवाशांना होणारा त्रास. नादुरूस्त बसेसमुळे शालेय विद्यार्थ्यांना वेळेवर शाळा महाविद्यालयात जाता येत नाही. याकरीता नवीन बसेसची नितांत आवश्यकता असल्याचे बागल यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिग्विजय बागल यांनी विधानसभा निवडणुकीत प्रचाराला अगदी कमी वे मिळूनही चांगली मते घेतल्याबद्दल कौतूक केले. भविष्यातील सर्व निवडणुकीत व विकासकामा करीता मी आपल्या निश्चित पाठीशी राहील; असे अभिवचन दिले.

नंतर दिग्विजय बागल यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेऊ घेऊन करमाळा एमआयडीसी मध्ये तातडीने उद्योग सुरु व्हावेत तसेच येथे वीज, पाणी याबाबतच्या सुविधा लवकरात लवकर देण्याबाबत कार्यवाही व्हावी; असे निवेदन दिले.

त्याचबरोबर संसद सदस्य व विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे, विधानपरिषद सदस्य आ.मनिषाताई कायंदे, माजी मंत्री व आमदार दिपक केसरकर, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे इ.ची सदीच्छा भेट घेतली.


सर्व गाठीभेटींमध्ये सर्वच मंत्रीमहोदयांशी तालुक्याच्या विकासकामां बाबत सकारात्मक चर्चा करून होकारात्मक प्रतिसाद दिल्याची प्रतिक्रिया दिग्विजय बागल यांनी यावेळी दिली. यावेळी मकाईचे संचालक आशिष गायकवाड व बाजार समितीचे संचालक कुलदीप पाटील उपस्थित होते.

# ज्ञानेश्वर वाचनालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम





करमाळा (सं.प्र.) : शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा येथील श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय करमाळा नगरपरिषद मध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत ग्रंथालयात स्वच्छता मोहिम राबवून ग्रंथालयातील निवडक ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी; हा उद्देश समोर ठेवून जास्तीत जास्त विद्यार्थी ग्रंथालयाकडे कसे वळतील, हा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनी, वाचक, सभासद, कर्मचारी तसेच विकी कांबळे, रोहित चौकटे, अजिम खान, संदीप आव्हाड, अमित कांबळे, दत्तात्रय घोलप, प्रदीप चौकटे, अमोगसिध्द परशेट्टी इ. बहुसंख्येने उपस्थित होते.

# २७ जानेवारीला स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज पादुका दर्शन सोहळा



करमाळा(सं.प्र.): रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळा २७ जानेवारीला सकाळी ९ वाजता करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये सुरूवातीला श्रींचे पादुकाचे आगमन, सामाजिक उपक्रम, गुरुपुजन, आरती सोहळा, प्रवचन, उपासक दीक्षा, दर्शन, पुष्पवृष्टी असे विविध कार्यक्रम होणार आहेत. तरी याप्रसंगी करमाळा शहर व तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन स्व-स्वरूप संप्रदाय सोलापूर जिल्हा सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
**चिवटे उपहारगृह**



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>म्हैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
**एकवेळ अवश्य भेट द्या..!**
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

**श्री गजानन अगरबत्ती**



● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

आंतरराष्ट्रीय विजेता

माजी सभापती न.पा.शिक्षण मंडळ

माजी आमदार





ॲरिस्टो किड्स मार्फत पुणे येथे घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैदिक वैदीक मॅथ्स् परीक्षेत करमाळा येथील **मुथा अबॅकस ॲकडमी** मधील विद्यार्थी

**कु.स्वरा प्रितम बलदोटा**

हिने झिरो **लेव्हल** मध्ये **आंतरराष्ट्रीय रँक सहावा** मिळवून घवघवीत यश संपादन केल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन

मार्गदर्शिका



सौ.ज्योती मुथा

शुभेच्छुक

**श्री.प्रकाशशेठ बलदोटा** (मा.सभापती, न.पा.शि.मंडळ)

**सौ.भारती प्रकाश बलदोटा**

**श्री.प्रितम प्रकाश बलदोटा, सौ.शितल प्रितम बलदोटा**

**कु.पलक प्रितम बलदोटा, कु.सौम्या प्रितम बलदोटा**

**समस्त बलदोटा परिवार, करमाळा.**





ॲरिस्टो किड्स मार्फत पुणे येथे घेण्यात आलेल्या **आंतरराष्ट्रीय** स्तरावरील अबॅकसच्या परीक्षेत करमाळा येथील **मुथा अबॅकस ॲकडमी** मधील विद्यार्थी

**चि.आदित्य अभिजीत दुधे**

याने **फर्स्ट लेव्हल** मध्ये **सेकंड रँक** मिळवून यश प्राप्त केल्याबद्दल..

हार्दिक अभिनंदन

**मार्गदर्शिका : सौ.ज्योती राजेश मुथा**



शुभेच्छुक

**दुधे परिवार, पांडे**

सौजन्य **मुथा पेंटस्** मंगळवार पेठ, करमाळा.(मो.९७३०५०५१५३)



## 2 BHK रो-हाऊस विकणे आहे

एस.टी. कॉलनी परिसरातील नवीन बांधकाम असलेले (७५० स्क्वे.फुट जागा, १३३० स्क्वे.फुट बांधकाम)

2 BHK रो-हाऊस योग्य किंमत आल्यास विकणे आहे

संपर्क : मो.9423237685, 9156361844




















सोलापूर जिल्ह्याच्या 'पालकमंत्री' पदी

**ग्रामविकास व पंचायतराज मंत्री**

**मा.ना.जयकुमार गोरे**

यांची निवड झाल्याबद्दल..

हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

जिल्हा सचिव



शाम सिंधी (भारतीय जनता पार्टी)

जिल्हा सरचिटणीस



नरेंद्रसिंह ठाकूर (भाजपा किसान मोर्चा)

माजी शहराध्यक्ष



संजय घोरपडे (भारतीय जनता पार्टी)

शहर सरचिटणीस



जितेश कटारिया (भारतीय जनता पार्टी)

शहर उपाध्यक्ष



सचिन चव्हाण (भारतीय जनता पार्टी)

# भावपूर्ण आदरांजली



कै.कोंडिबा नागनाथ घोलप
(मृत्यू दि.२७/१/२०२२)

दिवस मावळला तरीही.., संधिप्रकाश रेंगाळत असतो ।
त्याप्रमाणे तुमचा सहवास संपला तरीही..,
तुमच्या आठवणींचा सुगंध दरळवत असतो ।।

सेवानिवृत्त शिक्षक **कै.कोंडिबा नागनाथ घोलप** यांचे दि.२७ जानेवारी रोजी असलेल्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

अभिवादक

डॉ.अविनाश कोंडिबा घोलप, श्री.अक्षय भारत घोलप
डॉ.हृतिक अविनाश घोलप व समस्त घोलप परिवार करमाळा.

भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष
व आमचे मित्र

## मा.श्री.शशिकांत पवार

यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..

हार्दिक शुभेच्छा

26 जानेवारी



करमाळा शहर
व तालुकावासियांना
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !



शुभेच्छुक

## जितेश रणजीत कटारिया

सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी करमाळा.

१० वा वर्धापन दिन

।। गणेश कृपा ।।    ।। श्री नागनाथ प्रसन्न ।।

# श्री गणेश
## ड्रायफ्रुटस् & मसाला



सर्व ग्राहक, हितचिंतक, स्नेही व मित्र परिवार
यांचे सहकार्याने आम्ही १०व्या वर्षात पदार्पण करीत आहोत.
त्याबद्दल सर्वांचे आभार व धन्यवाद !

सर्व प्रकारचे ड्रायफ्रूट्स
योग्य भावात मिळतील !

प्रोप्रा : पोपट बोराडे (मो.8605633839)

पत्ता : गुजरगल्ली, करमाळा., जि.सोलापूर

# बाजार समिती कर्मचाऱ्यांविरूध्दच्या तक्रारीची न्यायालयाकडून दखल

## कार्यवाही पुढे सुरू करण्याचे आदेश

करमाळा(सं.प्र.): करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप यांनी बाजार समिती कर्मचाऱ्यांवर मनमानी कारभार करणे, कायदेशीर बाब असताना सुध्दा राजकीय व स्वत:चे हितसंबंध जोपासण्याकरीता बाजार समिती कायदेशीरपणे बंद ठेवणे, स्वत: राजकीय घडामोडीत हिरीरिने सहभागी होणे, कामावर हजर नसताना बोगस पगार उचलणे, शेतकरी विरोधी कार्य करणे, अफरातफर करून खोटे दस्त तयार करणे, संगनमत करून संघटीतपणे बाजार समितीचे न भरून येणारे नुकसान करणे, संस्थेची व शेतकऱ्यांची फसवणूक करून आंदोलन करून आदर्श सेवा नियमांचा भंग करणे इ. कलम ४२० (३१८/४), ४६६, ४६७, १६६ सह ३४ नुसार १६ मार्च ला बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांविरूध्द करमाळा फौजदारी न्यायालयात खाजगी तक्रार प्रकरण दाखल केले होते. सदर गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र असल्याने फौजदारी न्यायालय यांनी गंभीर दखल घेत सर्व आरोपी (कर्मचारी) यांचे विरूध्द १६ जानेवारी २०२५ रोजी इश्युप्रोसेसचा आदेश पारीत केला असून मे.कोर्टाने आदेशात नमूद केले आहे, की तक्रारदार यांचा अर्ज व पोलीस तपास अहवाल याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी वरील नमूद गुन्ह्याची कलमे आरोपींवर निष्पन्न झाल्याचे निर्दशनास आल्याने सर्व आरोपी विरूध्द वरील नमूद गुन्ह्यांचे कलमांन्वये कार्यवाही पुढे सुरू करणेकामी आदेश पारित केले आहेत. बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप यांचे वतीने ॲड.जयदीप देवकर हे काम पाहत आहेत.

# करमाळा आगारातील रखडलेले काम गतीने सुरू करावे

## पालकमंत्री गोरे यांना शशिकांत पवार यांचे निवेदन



करमाळा(सं.प्र.): करमाळा एसटी डेपो महामंडळ आवारामध्ये सुरू असलेले सिमेंट कॉंक्रीटीकरण तसेच मुलभूत विकासाच्या सोयी सुविधांचे काम रखडलेले असून ते काम त्वरीत चालू करून कामांना गती द्यावी; अशा मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार यांनी पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांना दिले आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे, की सद्य परिस्थितीमध्ये गेली काही दिवसांपासून करमाळा एसटी आगारात कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू झाले होते. परंतु काही कारणास्तव काम बंद ठेवण्यात आल्याचे दिसते. काम रखडल्यामुळे प्रवाशांचे नाहक हाल होत आहेत. खुदाईचे काम सुरू असल्यामुळे येणाऱ्या तालुक्यातील फेऱ्या तसेच पुणे, नाशिक, मुंबई, सोलापूर, नगर, धुळे इ. लांब फेऱ्यांच्या गाड्यांना प्लॅटफॉर्म वर लावण्यासाठी जागा तसेच प्रवाशांना रहदारीसाठी जागा अपुरी पडत आहे. माघवारी, संगोबा येथील आदिनाथ यात्रा तसेच तालुक्यातील यात्रा, शाळा, महाविद्यालयीन मुले यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. दहावी, बारावीच्या सुरू होत असलेल्या परीक्षा या सर्व बाबींचा विचार करून विकासकामांना गती द्यावी; अशी मागणी केली आहे. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकूर, भाजपाचे माजी शहराध्यक्ष संजय घोरपडे, सामाजिक कार्यकर्ते भिवा आरणे आदीजण उपस्थित होते.

**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स**
होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी
कॉटन साडी, पार्टीवेअर साडी,लेडीज टॉप व कुर्ती,
लेगीज, किड्स वेअर योग्य दरात मिळतील.
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
मकरसंक्रांती निमित्त
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)

**घोलप हार्डवेअर**
कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.
● प्लंबिंग मटेरियल
● नट बोल्ट
● मग ● झाडू ● टब
● कॅरेट ● ताडपत्री
● नायलॉन दोर
● प्लास्टीक कागद
संपर्क : मो.9922111204
पत्ता : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा.

# शहीद जवान निलंगे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त विशेष सन्मानाचे वितरण



करमाळा : शहीद जवान मेजर अमोल अरविंद निलंगे यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना विशेष पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले आहे. यामध्ये बार्शी येथील ॲड.राहुल झालटे, केम येथील प्राचार्य मनोज तळेकर, सालसे येथील लाल बहाद्दूर शास्त्रीचे विद्यालयाचे शिक्षक बाळकृष्ण लावंड, साडे येथील कै.सुभाष पाटील पतसंस्थेचे मल्हारी काळे, खांबेवाडी येथील जिल्हापरिषद शाळेचे पोपटराव पाटील, उमरड येथील वामनराव बदे विद्यालयाचे शिक्षक नंदकिशोर वलटे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नूतन आमदार नारायण आबा पाटील हे होते. अध्यक्षस्थानी यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील तसेच तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, गटविकास अधिकारी डॉ.अमित कदम, आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष आक्रुड शिंदे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत अरविंद निलंगे व आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळ तसेच साडे ग्रामपंचायतीच्या मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

# २७ ते २९ जानेवारी दरम्यान फ्री फिटनेस कॅम्प

करमाळा(सं.प्र.) : गयाबाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था आणि हॅप्पी माईंड, हॅप्पी हेल्थ फिटनेस अकॅडमी मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने करमाळा येथे २७ ते २९ जानेवारी दरम्यान फ्री फिटनेस कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. या कॅम्पचे उद्घाटन २६ जानेवारीला सायंकाळी पाच वाजता होणार आहे. फ्रि फिटनेस कॅम्प सकाळी ६ ते ८ व सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मा.जयवंतरावजी नामदेवरावजी जगताप बहुउद्देशीय सभागृह, खोलेश्वर मंदिर जवळ, किल्लावेस येथे होणार आहे. हा कॅम्प फिटनेस क्षेत्रात ३२ वर्ष कार्यरत असलेले विक्रमवीर महेश वैद्य यांचे मार्गदर्शनाखाली होणार असून यामध्ये शरीराची लवचिकता, स्नायु बळकटी, रोग प्रतिकार शक्ती वाढविण्याचे अत्यंत उपयुक्त असे व्यायामाचे प्रकार घेतले जाणार आहेत. तरी या कॅम्प शहरातील नागरीकांनी लाभ घ्यावा; असे आवाहन गयाबाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष किसन कांबळे यांनी केले आहे.

**जागा विकणे आहे**
करमाळा शहरातील भवानीपेठेतील रोडटच
असलेली (३८ X १६७) एकूण ६३५० स्के.फूट
जागा योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
संपर्क : मो.8888400555

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी, ३ चाकी, ४ चाकी, ट्रक, ट्रॅक्टर, JCB, पोकलेन, सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
**सुभद्रा पॉवर सोल्युशन्स**
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# उंदरगाव येथे श्रमसंस्कार शिबीरात १५० जनावरांचे लसीकरण



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना स्तर दोन व उंदरगाव येथे आयोजित केलेल्या श्रमसंस्कार शिबीरात विविध शेळ्या,मेंढ्या व जनावरांचे लसीकरण करण्यात आले. पीपीआर ही लस १५० जनावरांना देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी पशुवैद्यकिय अधिकारी डॉ.मनीष यादव, सहाय्यक पशुवैद्यकिय अधिकारी डॉ.झोळ, डॉ.गणेश बाबर, डॉ.राहुल जवळ, डॉ.दत्तात्रय वाघमारे, सरपंच युवराज मगर, उपसरपंच शिवाजी लोकरे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख, प्रा.सुजाता मोरे, प्रा.राहुल श्रीरामे, प्रा.संजय पाटील, प्रा.मनोहर धिंदळे, प्रा.रोकडे व एन.एस.एस.चे स्वयंसेवक उपस्थित होते.

# मनिषा साठे यांना हुतात्मा गौरव पुरस्कार प्रदान

करमाळा(सं.प्र.) हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था, कराड यांचे वतीने देण्यात येणारा हुतात्मा गौरव पुरस्कार करमाळा येथील सामाजिक कार्यकर्त्या मनिषा अजित साठे यांना नुकताच प्रदान करण्यात आले. अध्यात्मिक क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केल्याबद्दल सौ.साठे यांना आमदार सत्यजित देशमुख यांचे हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. सौ.साठे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल करमाळा येथील सामाजिक संस्था व महिला मंडळाने त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.




## फ्लॅट विकणे आहे

ICICI बँकेच्या जवळ असलेला १२५० स्क्वे.फूट चा फ्लॅट फर्निचर सहीत योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

संपर्क

मो.9423237685


## संस्कृती स्कुलचे स्नेहसंमेलन

करमाळा (सं.प्र.) : कृष्णाजीनगर येथील संस्कृती प्री-प्रायमरी स्कुलचे २६ जानेवारीला सायंकाळी चार वाजता स्नेहसंमेलन आयोजित केले आहे. यावेळी शहरातील जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा व मुख्य शिक्षिका सुमन बडेकर यांनी केले आहे. संस्कृती प्री-प्रायमरी स्कुलची स्थापना २०२४ ला झाली असून, शाळेने प्रथमच स्नेहसंमेलन आयोजित केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम होणार आहेत. हा कार्यक्रम कृष्णाजीनगर मध्ये सायंकाळी चार ते साडेसहा यावेळेत होणार असून पालकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन सहशिक्षिका विजयश्री गायकवाड व तेजश्री ओतारी यांनी केले आहे.


सा.कमलाभवानी संदेश
वार्षिक वर्गणी
२०० रू. भरून
वर्षभर घरपोच अंक मिळवा


## श्रमसंस्कार शिबीरांतर्गत घोटी येथे
# केम येथील उत्तरेश्वर महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता अभियान





करमाळा(सं.प्र.): केम येथील श्री उत्तरेश्वर ज्युनियर कॉलेजचे घोटी येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सात दिवसाचे श्रमसंस्कार शिबीर उत्साहात संपन्न झाले. या शिबीरात विद्यार्थ्यांनी श्रमदान करून संपूर्ण गाव स्वच्छ केले. विशेषत: घोटी येथील स्मशानभुमीही स्वच्छ करून सुंदर केली. गावातील हनुमान मंदिर, कोटलिंग मंदिर, महादेव मंदिर, सरकारी दवाखाना, जि.प.प्राथमिक शाळा, न्यु इंग्लीश स्कुल, गावातील रस्ते स्वच्छ केले. रस्त्याच्या कडेला असणारी झाडे झुडपे तोडून रस्त्यावरील अडथळा दूर केला.

मराठवाडा विभागप्रमुख प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख व गटविकास अधिकारी मनोज राऊत, राष्ट्रीय सेवा योजना पुणे विभागीय समन्वयक पोपटराव सांबारे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री उत्तरेश्वर ज्युनियर कॉलेज केम चे राष्ट्रीय सेवा योजनेचे पहिलेच शिबीर घोटी गावात संपन्न झाले. या शिबीराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख यांचे हस्ते झाले. या शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रवचनकार महादेव वाघमोडे, सरपंच विलास राऊत, शाळा समिती अध्यक्ष वसंत तळेकर, उपाध्यक्ष गणेश तळेकर, प्रा.अमोल तळेकर, मुख्याध्यापक कमलाकर सांगळे, लक्ष्मण मोरे आदीजण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वाघमोडे महाराज यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची बदलती मानसिकता आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व या विषयी मार्गदर्शन केले. सरपंच राऊत यांनी उत्तरेश्वर कॉलेजच्या उपक्रमाचे कौतूक करून यापुढेही घोटी ग्रामस्थांचे अशा सामाजिक उपक्रमास सहकार्य राहील; असे सांगितले.वसंत तळेकर यांनी शिबीरातून होणारा विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास व देशप्रेमाची भावना याविषयी मनोगत व्यक्त केले.

या शिबीरा दरम्यान प्रा.अमोल खारे यांचे कविता विद्यार्थ्यांच्या मना-मनातली., सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अभिमन्यु गुटाळ यांचे आजचा विद्यार्थी व मोबाईलचा गैरवापर, प्रा.नानासाहेब पवार यांचे महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, विजयकुमार गुंड यांचे आजची तरूणाई, भरत जाधव यांचे अध्यात्माचे आजच्या काळात महत्व अशी प्रबोधनपर व्याख्याने संपन्न झाली. महिला सक्षमीकरण कार्यक्रमात सुप्रिया मनोज राऊत, भाग्यश्री बोबडे-पाटील यांनी महिला महिला सबलीकरण या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले. आधुनिक शेती क्षेत्र भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी गावातील प्रगतशील शेतकरी हिराजी राऊत यांच्या शेतात भेट देऊन आधुनिक तंत्रज्ञान अवगत केले. याप्रसंगी शिबीर दरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या श्रमसंस्कार शिबीरासाठी प्र.प्राचार्य वैशाली नरखेडकर, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.मच्छिंद्र नागरे, प्रा.डॉ.संतोष साळुंखे, प्रा.संतोष रणदिवे, प्रा.एस.के. पाटील, प्रा.सतीश बनसोहे, प्रा.पराग कुलकर्णी, सचिन रणशृंगारे, लक्ष्मण गुरव, सागर महानवर, ओंकार घाडगे, वैजीनाथ दोलतडे, लक्ष्मण थोरात, शिवाजी लोकरे, ज्ञानेश्वर काशीद यांचे सहकार्य लाभले.


साई स्टील रेलींग & किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502

पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.

• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.

प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# ग्रामीण भागातील ग्रंथालये सुसज्ज हवीत : प्रमोद झिंजाडे

करमाळा (सं.प्र.) : विद्यार्थ्यांना नागरी सेवेत यश मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील ग्रंथालये सुसज्ज हवीत; असे मत महात्मा फुले समाजसेवा मंडळ चे अध्यक्ष प्रमोद झिंजाडे यांनी व्यक्त केले.

करमाळा वाचनालय संघ व महात्मा फुले समाजसेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करमाळा तालुक्यातील शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांची एक दिवसीय कार्यशाळा ज्ञानेश्वर वाचन मंदिर येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मार्गदर्शक म्हणून श्री.झिंजाडे बोलत होते. महाराष्ट्रात सध्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम सर्वत्र चालू आहे. याचाच एक भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना श्री.झिंजाडे म्हणाले, की वाचन चळवळ वृध्दींगत होण्यासाठी वाचनालयातील कर्मचारी, पदाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात वाचनालयात चळवळीची जनजागृती करावी. सध्या ग्रामीण भागातील ग्रंथालयांना इमारत व जागेची समस्या खूप मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. ग्रंथालयांनी शासकीय योजनांचा लभा घेऊन महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत ६० : ४० च्या माध्यमातून ग्रंथालयांना इमारत बांधकामास ग्रामपंचायतीकडे ग्रामसभेत मागणी करावी व तसा ठराव करावा. ग्रंथालयाच्या इमारती सुसज्ज झाल्यास यातून गावातील विद्यार्थी अभ्यास करून नागरी सेवेत दाखल होतील त्यांना अभ्यासासाठी वातावरण निर्मिती करून द्यावी. जास्तीत जास्त वाचक ग्रंथालयाकडे कसे येतील यासाठी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ग्रंथालय ही ग्रामीण भागातील गावाची माहिती व सेवा केंद्र बनावीत शासनाच्या योजना ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कार्य ग्रंथालयांनी करावे. तसेच प्रत्येक गावातून स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी तयार करून त्यांना नागरी सेवेत मोठ्या प्रमाणात यश येईल; यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय मोरे यांनी केले तर प्रास्ताविक भास्कर पवार यांनी केले. उपस्थितांचे आभार विठ्ठल वरकड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी तालुक्यातून ग्रंथालय कर्मचारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीराम महिला गटाच्या वतीने शहरातील महिलांसाठी तीर्थयात्रा




करमाळा(सं.प्र.): श्रीराम महिला गट च्या वतीने करमाळा शहरातील महिलांसाठी प्रथमच आयोजित केलेली आयोध्या, काशी, प्रयागराज, नेपाळ तीर्थयात्रा उत्साहात संपन्न झाली.

महिलांनी महिलांसाठी आयोजित केलेली ही तीर्थयात्रा फक्त नऊ हजार रूपयात झाली. या यात्रेसाठी गटाचे संचालक जयराम गायकवाड यांनी स्वत:कडचे प्रत्येक महिलेला दहा हजार खर्च केले. दरवर्षी ते तीर्थक्षेत्री सहल आयोजित करून ११ हजार महिलांना तीर्थयात्रा घडवून आणतात. सदरची तीर्थयात्रा यशस्वी करण्यासाठी संगीता नष्टे, मिनाक्षी गुंजगावकर, संगीता वनारसे व श्रीराम महिला गटाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सदरची तीर्थयात्रा संपन्न झाल्यानंतर महिलांनी महिलांसाठी सामुदायिक गंगापुजन कार्यक्रम आयोजित केला. यावेळी पुजन, आरती होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आला.

**गाळे भाड्याने देणे आहे**

संगोबा रोडवरील चांदगुडे प्लॉट मधील रोडटच असलेले आदिनाथ महाराज कॉम्प्लेक्स मधील गाळे भाड्याने देणे आहे

संपर्क : 9552997035, 9657874179, 9822921962

॥ श्री कमलाभवानी प्रसन्न ॥

**सोनाली प्लाय फर्निचर**

डोअर, स्लायडिंग विंडो
SS स्टील रेलिंग
तयार करून मिळेल.

• शिवाजी खाडे (९४०४२९९६९६) • जगन्नाथ खाडे (९८५०९३०७७५)

पत्ता : गाळा नं.४७/४८, जामखेड रोड, करमाळा., जि.सोलापूर

# न्यु इरा पब्लिक स्कुलचे शासकीय एलिमेंटरी परीक्षेत उज्वल यश

करमाळा (सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य कला संचालयानाच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत न्यु इरा पब्लिक स्कुल चिखलठाण व ज्यु.कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करून आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली.

शासकीय एलिमेंटरी परीक्षेत एकुण ४१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ए ग्रेड मध्ये १, बी ग्रेड मध्ये ४ व सी ग्रेड मध्ये २८ पास झाले आहेत.

एलिमेंटरी परीक्षेत ए ग्रेड मध्ये पास झालेले विद्यार्थी : ऋतुजा नितीन टकले, बी ग्रेड मध्ये पास झालेले विद्यार्थी : संध्याराणी श्रीकृष्णा लबडे, स्नेहल विकास गव्हाणे, मयुरी सचिन लोखंडे, राजनंदिनी प्रशांत आतकर, सी ग्रेड मध्ये पास झालेले विद्यार्थी : अक्षरा दादा पोरे, आयशा अमजद शेख, नम्रता प्रताप लोखंडे, समृध्दी दिगंबर शंकर, समृध्दी सचिन बोराडे, शिवानी राहुल लबडे, शिवानी रामचंद्र सरडे, श्रावणी धनाजी पोटे, श्रावणी गोरख लगस, श्रुतिका शरद पोल, स्वरा प्रदीप शिंदे, तनया रोहिदास खोलासे, अक्षरा संदिपान कामटे, अवधूत संतोष उंबरे, धीरज धनंजय कोरे, कन्हैया ज्योतीराम जाधव, केतन दादाराम पोरे, पार्थ उमेश बोराडे, प्रणव सचिन धारक, रविराज राजेंद्र साबळे, रिषभ बाळासाहेब गावडे, शंभुराज सचिन निंबाळकर, शिवम उदयसिंह पाटील, सोहम ज्ञानदेव सरडे, सुहास भारत मुळीक, विरेन गंगाधर पोळ, यश ज्ञानदेव सरडे, विराज सचिन सरडे या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थापक अध्यक्ष डॉ.ब्रिजेश बारकुंड, सचिव सुनील अवसरे, मुख्याध्यापक कसबे, सर्व शिक्षक व पालकांनी केले.

**श्वेता**
गिफ्ट & टॉईज
2025 या नवीन वर्षात
प्रजासत्ताक दिनानिमित्त
विशेष डिस्काऊंट ऑफर
आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त
आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप)
भेट द्या !
पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
(9822058106, 7798307085)

## दारू पिण्यास पैसा का देत नाही या कारणावरून एकास बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.) : दारू पिण्यास पैसे का देत नाही या कारणावरून चौघांनी एकास चाकूने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार नेरले येथे १६ जानेवारीला रात्री साडेआठ वाजता घडला आहे. या प्रकरणी गौस दस्तगीर पाटील (रा.नेरले) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की रात्री साडेआठ वाजता गावातील संपत माणिक काळे, बाबा मधु काळे, शिवाजी जोतीराम दौंड, पृथ्वीराज उर्फ गोट्या कांतीलाल काळे हे सर्वजण दारू पिऊन आले व दारू पिण्यासाठी पैसे का देत नाही म्हणून त्यांनी चाकूने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

## महावितरणच्या कामात अडथळा आणणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : डिपी मध्ये अनाधिकृतपणे जोडलेली केबल काढून सरकारी वाहनात टाकण्यास प्रतिबंध करणाऱ्या आळजापूर येथील चौघांविरूध्द महावितरणच्या करमाळा कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता विशाल सुर्यवंशी यांनी करमाळा पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की १३ जानेवारीला दुपारी साडेबाराच्या सुमारास महावितरणचे सरकारी कर्मचारी आळजापूर शिवारातील गपाट वस्तीवरील डिपीतून अनाधिकृतपणे टाकलेली केबल काढीत असताना भारत रामचंद्र गपाट, ज्ञानदेव भारत गपाट, किसन पंढरीनाथ गपाट आणि अर्जुन भारत गपाट (सर्व रा.आळजापूर) या चौघांनी त्यांना केबल काढण्यास प्रतिबंध करून ढकलून देऊन शासकीय कामकाजात अडथळा आणला. तसेच त्यानंतर आम्ही सरकारी वाहनाने निघालो असताना जाण्यास प्रतिबंध केला. या तक्रारीवरून करमाळा पोलीसांनी वरील चौघा संशयितांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## फोटो काढून अल्पवयीन मुलीवर अत्याचार - एकाच्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : अश्लील फोटो काढून अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी एकाच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २० एप्रिल २०२२ ते गुन्हा दाखल करेपर्यंत सुरू होता. या प्रकरणी १९ वर्षाच्या युवतीने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की मी दहावीची परीक्षा दिल्यानंतर घरी असताना समाधान बिभिषण भोगल (रा.बोरगाव) हा माझ्या घरी आला व त्याने जबरदस्तीने माझे कपडे काढायला लावून अश्लील फोटा काढले व फोटो सर्वांना पाठवेन; अशी धमकी देवून त्याने माझ्यावर वारंवार अत्याचार केले. एवढेच नाहीतर खाजगी संस्थेत नेवून लग्नही केले. या प्रकरणी पोलीसांनी भारतीय दंडसहिता ३७६/२/एन तसेच बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियमानूसार गुन्हा दाखल केला आहे.

## बांधाच्या झाडावरून तिघांना बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.) : बांधाच्या झाडावरील नारळाचे फाटे का तोडले नाही या कारणावरून एकाने तिघांना दगडाने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १९ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता कंदर येथे घडला आहे. या प्रकरणी प्रिती लक्ष्मण देवरकर (रा.कंदर) या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की बांधावरील नारळाच्या झाडाचे फाटे का काढले नाही.. असे म्हणून वैभव बाबुराव देवरकर याने माझ्या पतीला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मी व माझे सासरे त्यांना सोडविण्यास गेलो असता, त्याने तेथे पडलेला दगड घेऊन माझ्या उजव्या हातावर मारून जखमी केले आहे. तसेच फाटे तोडले नाहीतर आणखीन मारहाण करीन; अशी धमकी दिली. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## नुकसान भरपाईची मागणी केल्यावर दहा जणांकडून मारहाण

करमाळा (सं.प्र.) : ऊसाचे पाचट पेटविल्यानंतर त्याचा जाळ शेजारच्या शेतात जावून तेथील ठिबक सिंचन जळाले. त्या जळालेल्या ठिबक सिंचनची नुकसान भरपाई मागितल्यानंतर दहा जणांनी मारहाण केल्याची तक्रार देण्यात आली आहे. हा प्रकार १९ जानेवारीला सायंकाळी सहा वाजता पोथरे येथे घडला आहे. या प्रकरणी शांतीलाल शामराव झिंजाडे (पोथरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की अंगद शिंदे याने त्याचे शेतातील ऊसाचे पाचट पेटविले होते. त्या पाचटाचा जाळ आमच्या शेतात येऊन आमचे ठिबकचे पाईप जळाले. त्याबाबत त्यांना विचारणा केली असता, अंगद शिंदे सह अन्य दहा जणांनी मला व माझ्या मुलाला बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे




जेऊर येथील भारत हायस्कुलचे प्रा.डॉ.अरविंद दळवी यांना राष्ट्रीय दर्जाचा बेस्ट अकॅडमीक एक्सलन्स अवॉर्ड फोर लाईफ टाईम अचीवमेंट हा पुरस्कार पुणे येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मिळालेल्या पुरस्काराबद्दल आमदार नारायण पाटील, लोकनियुक्त सरपंच पै.पृथ्वीराज पाटील, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य, शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## खडकेवाडी येथील तुषार शेळके यांची अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून निवड



करमाळा(सं.प्र.) : खडकेवाडी येथील तुषार पांडूरंग शेळके यांची महाराष्ट्र लोकसेवा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमधून अन्न व औषध प्रशासन या विभागात अन्न सुरक्षा अधिकारी (राजपत्रित अधिकारी) पदासाठी निवड झाली आहे. शेळके हे सध्या रेल्वे विभागात अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नोकरी सोबत स्पर्धा परीक्षा द्यायचे त्यांचे चालू होते. त्यांच्या या निवडीनंतर त्यांचे खडकेवाडी परिसरातून अभिनंदन करण्यात येत आहे. अन्नाची गुणवत्ता व भेसळ रोखण्यासाठी कोठेही झडती घेणे, साठा जप्त करणे, वॉरंट काढणे, खटला चालवणे इ. अधिकारी अन्न सुरक्षा अधिकार यांना प्राप्त आहेत. तसेच एफएसएसएआय तर्फे देण्यात येणाऱ्या अन्न व पेय यासाठी लागणाऱ्या लायसन्स प्रक्रियेमध्ये अन्न सुरक्षा मानके कायदा - २००६ नूसार तपासणी व कारवाई करण्याचे अधिकार व जबाबदारी या पदावर असते.

डॉ.शेलार
हॉस्पिटल
नवीन प्रशस्त जागेत
नवीन रूपात...
दि.२६ जानेवारी पासून
स्थलांतर



नवीन पत्ता : ICICI बँकेच्या पाठीमागे, श्रावणनगर, करमाळा.
टीप : हॉस्पीटल कामासाठी स्टाफ पाहिजे. गरजूंनी संपर्क करावा..!
संपर्क : डॉ.शेलार (9922957895)

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल


आपल्या सर्वांच्या प्रचंड प्रतिसादाबद्दल मन:पूर्वक धन्यवाद !
सर्वांच्या आग्रहास्तव हुरडा महोत्सवाच्या कालावधीत वाढ !
हुरडा महोत्सव
• कालावधी •
दि.१९ जानेवारी ते
५ फेब्रुवारी २०२५
• वेळ •
सकाळी ११.०० ते
सायं ६.०० पर्यंत
करमाळा शहरापासून
३ किमी अंतरावर
(करमाळा–अहमदनगर महामार्गावर
MIDC च्या पुढे ५०० मीटर अंतरावर)
गुळभेंडी हुरडा
विविध प्रकारची चटणी, फरसाण, रेवडी, गोडीशेव
ॲडव्हान्स बुकींग आवश्यक
अस्सल गावरान जेवण
चुलीवरील भाकरी, बेसन, ठेचा, पापड, लोणचे
ऊसाचा रस
ऊस, विविध प्रकारचे फळे
• प्रौढ : ३५० रू. प्रत्येकी
• मुले : २०० रू. प्रत्येकी
(१२ वर्षे आतील)
लहान मुलांसाठी खेळणी
✲ आयोजक ✲
संदेश परिवार
करमाळा., जि.सोलापूर
बुकींगसाठी संपर्क...
मो.7798307085


आंतरराष्ट्रीय विजेता
ॲरिस्टो किड्स मार्फत पुणे येथे घेण्यात आलेल्या
आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैदीक मॅथ्स् परीक्षेत
करमाळा येथील
मुथा अबॅकस ॲकडमी मधील विद्यार्थी
कु.स्वरा प्रितम बलदोटा
हिने झिरो लेव्हल मध्ये आंतरराष्ट्रीय रँक सहावा
मिळवून घवघवीत यश संपादन केल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
श्री.प्रशांत ढाळे
(मा.नगराध्यक्ष)
शुभेच्छुक
गजानन
स्पोर्टस् ॲन्ड सोशल क्लब
वेताळपेठ, करमाळा.


शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, करमाळा
या संस्थेचे नामकरण
मदनदास देवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था
करमाळा (जि.सोलापूर) असे नामकरण केल्याबद्दल
मा.देवेंद्रजी फडणवीस (मुख्यमंत्री), मा.ना.मंगलप्रभात लोढा (कौशल्य विकास व रोजगार मंत्री)
तसेच महाराष्ट्र शासनाचे
जाहीर आभार..!
आपले नम्र
जिल्हा सचिव
शाम सिंधी
(भारतीय जनता पार्टी)
जिल्हा सरचिटणीस
नरेंद्रसिंह ठाकूर
(भाजपा किसान मोर्चा)
माजी शहराध्यक्ष
संजय घोरपडे
(भारतीय जनता पार्टी)
शहर सरचिटणीस
जितेश कटारिया
(भारतीय जनता पार्टी)
शहर उपाध्यक्ष
सचिन चव्हाण
(भारतीय जनता पार्टी)